## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत

## महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा

### शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये अनसरवाडा येथे घेतलेल्या शिबिराची क्षणचित्रे.दिनांक०८ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०१७



वार्षिक विशेष शिबिराचे उद्घाटन करताना मा.अशोकराव पाटील निलंगेकर साहेब.



वार्षिक विशेष शिबिराचे उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना मा. अशोकराव पाटील निलंगेकर साहेब.







दंत तपासणी शिबीर अंतर्गत ग्रामस्थांची दंत तपासणी करताना निलंगा येथील प्रसिद्ध डॉ.बसुदे.



पशु आरोग्य तपासणीसाठी पशुंसह उपस्थित ग्रामस्त.



पशूंची तपासणी करताना पशु वैद्यकीय अधिकारी.





ग्रामपंचायत कडून बांधलेल्या व ग्रामस्तानी बुजवलेल्या नालींचे खोदकाम करून त्या पुन्हा सांडपाण्यायोग्य करताना रासेयो स्वयंसेवक.



बुजवलेली नाली खोदताना रासेयो स्वयंसेवक.




श्रमदानातून ग्रामस्वच्छतेचा संदेश देताना रासेयो स्वयंसेविका.






सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोष खड्डे खोदताना, असेयो स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी व ग्रामस्थ.





गावाशेजारी असलेले ग्रामदैवत गैबिसाब दर्ग्याची स्वच्छता करताना.



गावाशेजारी असलेले ग्रामदैवत गैबिसाब दर्ग्याची स्वच्छता करताना



ग्रामस्वच्छता व अंधश्रद्धा निर्मुलन या विषयावर मार्गदर्शन करताना स्व.प्रा.ओमप्रकाश मदनसुरे.



लोकमत

विविध वार्ता

अनसरवाडा येथे महाराष्ट्र महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते झाले.

## महाराष्ट्र महाविद्यालयाच्या रासेयोचे शिबीर

निलंगा– येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबीर अनसरवाडा येथे घेण्यात आले. उद्घाटन अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एल. एरंडे होते. जि.प.चे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, उपप्राचार्य डॉ. एम.एन. कोलपुके, प्रा. प्रशांत गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अशोकराव पाटील म्हणाले, पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्या संरक्षणाची गरज आहे. स्वच्छतेमुळे प्रदूषण, रोगराई यापासून बचाव होतो. मानवी शरीर संपत्ती सदृढ बनते. त्यामुळे नागरिकांनी शिबिराच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. व्ही.एल. एरंडे यांनी शिबिराच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. जी.जी. शिवशेट्टे, डॉ. सुभाष बेंजलवार, प्रा. व्ही.एस. जाधव, सरपंच पद्मीनबाई उसनाळे, बालाजी उसनाळे, डी.जी. माने आदी उपस्थिती होते.



# महाराष्ट्र महाविद्यालयातील 'रासेयो'चे विशेष शिबिर

**प्रतिनिधी**

**निलंगा** : येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्याविशेष शिबिराचे आयोजन मौजे आनसरवाडा या गावी करण्यात आलेआहे. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन दि. ८डिसें. रोजी करण्यातआले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व उद्‌घाटक मा. अशोकराव पाटीलनिलंगेकर साहेब हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचेप्राचार्य डॉ. व्ही.एल. एरंडे हे होते. यावेळी कार्यक्रमासाठी जि.प. माजीअध्यक्ष पंडितराव धुमाळ, निलंगा तालुका काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष मा. विजयकुमार पाटील, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एम.एन. कोलपुके, प्रा. प्रशांत गायकवाड हे आवर्जुन उपस्थित होते. उद्‌घाटन कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना अशोकरावपाटील निलंगेकर यांनी पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीच्यासंरक्षणाची गरज व्यक्त केली. तसेच ग्राम स्वच्छतेचे महत्त्व पटवूनसांगितले. ग्रामस्वच्छेतेमुळे प्रदूषण, रोगराई यापासून बचाव होतो. मानवी शरीर संपत्ती सुदृढ बनते. त्यामुळे नागरिकांनी राष्ट्रीय सेवायोजनेच्या कार्यात स्वयंसेवकासोबत सक्रीय सहभाग नोंदवावा वगावाला स्वच्छ, सुंदर, व निरोगी बनवावे असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. व्ही. एल. एरंडे यांनी आपलेमनोगत व्यक्त करताना या शिबिराच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थी गावात निश्चितच सकारात्मक बदल घडवून आणतील असाविश्वास व्यक्त केला. स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातूनगाव कऱ्यासमोर स्वच्छतेचा आदर्श निर्माण करावा असेही ते म्हणाले कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. जी. जी. शिवशेट्टे, डॉ. सुभाष बेंजलवार, प्रा. व्ही.एस. जाधव, सरपंच सौ. पद्मीनबाई उसनाळे, गावातील जेष्ठ बालाजी उसनाळे, डी.जी. मानेआदींनी परिश्रम घेतले.

शिबिरासंदर्भातील वर्तमानपत्रातील कात्रणे.